महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : managerpom@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.साप्रवि/रवका/सा.आ.च११७/न.क्र.५६९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २४०७७४४१
फॅक्स क्रमांक ०२२-२४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३३६ दिनांक ०२ / ०५ / २०११

विषय : म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना ०१ मे २०११ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

वाचा : स.सा.आ.क्र.११७ (क) दिनांक ३१.३.१९८६

......

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा-१११९/प्र.क्र.६४/सेवा-९ दि.२६ एप्रिल २०११ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना दि.०१.०५.२०११ पासून सुधारित वेतन संरचनेतील मुळ वेतनावरील (वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ४५ % वरून ५१ % केला आहे.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना ४५ % ऐवजी ५१ % अशा सुधारित दराने दि.०१.०५.२०११ पासून महागाई भत्ता देण्याबाबत संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी दिली आहे.

४. परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेल्या सुधारित दरानुसार महागाई भत्त्याची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे **मे २०११** पासूनच्या वेतनामध्ये समाविष्ट करुन देण्यात यावी.

५. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासबंधात विद्यमान तरतुदी व कार्यपध्दती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या इट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

(विजय भि. बागुल) २/५/२०११
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
म.रा.वि.वि.कं.मर्या.च्या प्रेषण यादीप्रमाणे.

*D:\O&M\D.A-Adm.Circular-Nov.2010.doc*
*27/04/11*